# ग्रामीण रोजगार निर्मिती

- प्रा. महेश देशमुख, डॉ. एस. पी. चांगाडे, प्रा. एस. एस. चोपडे द. त. म. उदगीर

**महाराष्ट्र शासनाचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग मार्फत ग्रामिण रोजगार निर्मिती साठी विविध योजना राबविल्या जाता या योजनांची माहिती. थोडक्यात नमुद करण्यात आली असून या माहितीच्या आधारे निश्चितच विकास प्रवाहात**

**1. ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी पशुसंवर्धन आणि दुग्धविकास योजना :-**

राज्यात केवळ 16 टक्के जमिन संचनखाली असून उर्वरित 84 टक्के शेतजमीन ही पावसावर अवलंबून अथवा कोरडवाहू आहे. त्यामुळे पावसाळ्याचे चार महिने शेतकरी शेतीच्या कामात गुंतलेले असतो. उरलेले आठ महिने त्याच्यासमोर रोजगाराचा प्रश्न असतो. पशुसंवर्धन दुग्धव्यवसायाने शेतकऱ्याचा हा प्रश्न मोठा प्रमाणावर सोडवलेला आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायामुळे शेतकऱ्याला वर्षभर रोजगार प्राप्त होतो.

सासाठी स्थापन करण्यात आलेल्या पशुसंवर्धन खात्याच्या योजनांमध्ये प्रामुख्याने पशुवैद्यकीय सेचा, पशु आरोग्य, पशू व महिष विकास, कुक्कुट पालन, शेळी - मेंढी पालन, वैरण विकास आदींचा समावेश आहे.

**2. पशुपालनातून रोजगार निर्मिती :-**

राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत इच्छुक सुशिक्षित बोराजगारांना दुधाळ जनावरे संगोपनाचे प्रशिक्षण, शेळी - मेंढी पालनाचे प्रशिक्षण, कुक्कुट पालन प्रशिक्षण, ससे पालन, वराह पालन, वैरण उतपादन प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचाकालावधी एक आठवडा असतो.

3. पशुजाद्य व वैरज विजास :-

राज्यातील 33 जिल्ह्यांमध्ये जिल्हा नियोजन विकास यंत्राणेमार्फत वैरण विकास कार्यक्रम योजना राबवली जाते. वैरण विकास योजनेसाठी जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्याचा लाभ जिल्ह्यातील शेतकरी घेतात. वैरण बियाणे वेळेत शेतकऱ्यांना मिळावे यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी शासनमान्य संस्थाकडून बियाणे खरेदी करुन त्याचे वाटप करतात.

4. पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय योजना :-

पंतप्रधान पॅकेज अंतर्गत दुधाळ जनावरांचे वाटप ही योजना विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांमध्ये (बुलढाण, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व अकोला) राबविण्यात येते यमध्ये जेंद्र शासनातर्फे 50 टक्के राज्य शासनातर्फे 25 टक्के अनुदार देण्यात येते. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासन दुधाळ जनावरांचे वाटप या बाबीसाठी 25 टक्के इतके पूरक अनुदान देते. हे अनुदार महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाकडे वर्ग करण्यात येते.

5. राज्यातील जनावरांना आवश्यक असणाऱ्या क्षर मिश्रणे सूक्ष्मद्रव्ये यांचा अभ्यास करणे :-

अनावरांना त्यांच्या आहारात आश्यक असणाऱ्या अन्नघ्झटकांची व क्षरमिश्रणांची कमतरता भरुन ज ढण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतील जनावरांच्यारक्तातील त्यांना पुरविण्यात येणाऱ्या जाद्य व चाऱ्यातील तसेच शेतजमिनीतील क्षरांचे प्रमाण विश्लेषणाद्वारे शोधून प्रत्येक जिल्ह्यात कोणत्या क्षारांची आवश्कता आहे. याचा अभ्यास राज्याच्या पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठा अंतर्गत असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयामार्फत तसेच कृषी महाविद्यालयामार्फत करण्यात येतो.

6. संकरित कालवडी व सुधारित म्हशींच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम :-

सदर योजना जिल्हा परिषदेच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते. संकरित कालवडी व सुधारित म्हशींच्या पारड्यांची जोपासना करण्यासाठी व पशू स्वास्थ व आरोग्यासाठी संकरित कालवडी व सुधारित म्हशींच्या पारड्यांना 50 टक्के अनुदानावर खाद्य अनुदान देण्यात येते. ही योजना सर्वसाधारण, विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील व आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येते.

7. पशुसवंर्धन व दुग्धव्यवसायविषयज प्रशिजज :-

ही योजना जिल्हा परिषदेच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्वसाधारण तसेच अनुसुचित जाती / नवबौद्ध लाभधारकांना पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायविषयक प्रशिक्षण देण्यात येते. ही योजना सर्वसाधारज, विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्राबाहेरील व आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येते.

8. शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन देणे :-

ही योजना जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते. पशुस्वास्थ व आरोग्यासाठी शेतकऱ्यांच्या क्षेत्रावर वैरण उत्पादनासाठी उत्तेजन देण्यात येते. या योजनेअंतर्गत वैरण उत्पादनास उत्तेजन देण्यासाठी खते व बी - बियाणाचे 100 टक्के अनुदानावर वाटप करण्यात येते. दुभत्या जनावरांना खाद्य अनुदानावर देणे. ही योजना जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते. दुधाळ जनावरे गट वाटप योजनेअंतर्गत वाटप केलेल्या दुधाळ जनावरशंना भाकउ काळात तसेच प्रगत गर्भावस्थेच्या काळात 100 टक्के अनुदानावर खाद्य पुरवठा करण्यात येतो.

अनुसुचित जाती / जामतीच्या लाभधारकांना दुभत्या जनावराचा पुरवठा करणे ही योजना जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते.

अनुसुचित जाती / जमातीच्या लाभधारकांना 50 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांच्या गटाचा पुरवठा करण्यात येतो.

राष्ट्रीय गुरे व महिष पैदास प्रकल्प लघुयोजना - राष्ट्रीय गुरे व महिष पदास प्रकल्पांतर्गत राज्य व पशुधन विकास मंडळामार्फत खालील महत्त्वाच्या योजना राबविण्याचा संकल्प आहे.

1. राज्यातील पशुपैदास प्रक्षेत्रांना पायाभूत सुविधा पुरवून त्यांचे बळकटीकरण करणे व त्याद्वारे उच्च आनुवंशिकतेच्या वळूंची निर्मिती करणे.
2. गोठीत रेतमात्रांची निर्मिती, जतन व पुरवठा करणे या योजनेअंतर्गत गोठीत रेत प्रयोजशाळा पुजे, नागपूर व औरंगाबादचे आधुनिकिकरण करणे.
3. दुधाची साठवणूक व पुरवठा यंत्रणेचे बळकटीकरण करणे याअंतर्गत स्टोरेज टॅंक / मोबाईल ट्रॅकर्स जरेदी करणे व कार्यान्वित करणे.
4. माहिती व तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (मॅनेजमेंट, इन्फॉरमेशन, सिस्टीम) विकसीत करणे, ज्याद्वारे शेतकरी / पशुपालकांना पशुपैदास व पशुसंगोपनाबाबत अद्ययावत माहिती तात्काळ उपलब्ध होईल.
5. तांत्रिक बेरोजगार पशुवैद्यकामार्फत कृत्रिम रेतनांच्या सुविधा पुरविणे व पशुपैदास जार्यक्रमाची व्याप्ती वाढवणे.
6. कृत्रिम रेतन सुविधा शेतकऱ्यांच्या दारापर्यंत उपलब्ध होण्यासाठी कृत्रिम रेतन केंद्रांना दुचाकी वाहने पुरवजे.
7. कृत्रिम रेतनाचे कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना अद्ययावत शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षण देणे. ज्याद्वारे अद्ययावत व प्रगत कृत्रिम रेतन तंत्रज्ञानाचा वापर करुन गायी, म्हशींमधील गर्भधारणेचे प्रमाण वाढवता येईल.
8. स्वयंसेवी संस्थाना पशुपैदास, गोठीत रेतमात्रांची निर्मिती, तसेच प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी अर्थसहाय्य देजे.
9. भारतीय कृषी औद्योगिक प्रतिष्ठान, पुणे, गोशाळा, पांजरपोळ इत्यादी संस्थाना त्यांच्याकडील जोठीत रेत प्रयोगशाळा, प्रशिक्षक सुविधांचे बळकटीकरण, पशुधन खरेदी इत्यादी योजनांकरिता निधी उपलब्ध करुन देणे.
10. सहकारी दूध संस्थांना अर्थसहाय्य देऊन पशुपैदास सुविधा, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादीमध्ये वाढ करणे.

9. कुक्कुटपालन :-

जेल्या तीन ते चार दशकांपासून कुक्कुटपालना व्यवसाय मागील राज्यात वेगाने वाढत आहे. पशुगणना 2007 नुसार, राज्यात कुक्कुटवर्गीय पक्ष्यांची संख्या 687.45 लक्ष इतकी आहे. राज्यातील 2010 - 2011 मधील एकूण अंदाजित क्रमांक आहे. राज्यात कुक्कुट विकासासाठी अजूनही बराच वाव आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या सहकार्याने राज्यात सहाकारी तत्वावर 73 जुक्कुटपालन संस्था सुरु करण्यात आल्या आहेत. यासाठी राष्ट्री सहकार विकस निगमतर्फे कर्ज उलबल्ध करुन दिले जाते. त्याची परतफेड 14 वर्षांत करायची असते. आणि उर्वरित 11 वर्षांत व्याजासह कर्ज परतफेड करावी लागते.

10. अंडी उबवणी केंद्र :-

राज्यात शासनाने चार मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र स्थापन केली आहेत. पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, व नागपूर या ठिकाणी ही उबवणी केंद्रे आहेत. या अंडी उबवणी केंद्रात निर्माण केलेली पिल्ले मागणीनुसार कुक्कुटपालकांना तसेच सरकारच्या विविध योजनांतर्गत पुरवली जातात. त्याचबरोबर ग्रामीण स्तरावर उबविण्याच्या अंड्यांची विक्री करण्यात येते. कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना सुधारित संकरित जातीच्या कोंबड्यांची, अंड्यांची उपलब्धता व्हावी व त्यांच्या आर्थिक विकासात भर पडावी यासाठी उबवणी केंद्र कार्यरत आहेत. या केंद्राकडून त्या त्या विभागातील साधन कुक्कुटविकास गटांनादेखील पिल्लांचा पुरवठा करण्यात येतो. राज्यात कार्यान्वित असलेले कुक्कुटप्रकल्प हे वेगवेगळ्या पक्षी क्षेमतेचे असून त्या प्रकल्पांना 47 लाख ते 90 लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य करण्यात आले आहे.

11. तलंग वाटप योजना :- राज्यात ही योजना बिगर आदिवासी सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थीसाठी 50 टक्के अनुदानावर निधीच्या उपलब्धतेनुसार काही जिल्ह्यामध्ये राबविण्यात येते.

या योजनेत 8 ते 10 आठवडे वयाच्या तलंगाचे गट वाटप (10 माद्या आणि 1 नर) करण्यात येते.

या गटाची एकूण किंमत 800 रुपये आहे. त्यापैकी 50 टक्के खर्च लाभार्थींना पक्षीवाटप केलयानंतर लागणाऱ्या खाद्यावरील खर्च, पाण्याची भांडी, खाद्याची भांडी इत्यादी खरेदी करण्यासाठी दिला जातो.

12. कंत्राटी पद्धतीने मांसल कुक्कुटपाल-ा व्यवसाय सुरु ज्रजे :-

ुक्कुट मांस उत्पादनास मोठा वाव आहे. ज्या जिल्ह्यामध्ये सध्या कुक्कुटपालन, कुक्कुटमांस उत्पादन करण्याचा व्यवसाय अद्याप रुजलेला व वाढलेला नाही. तिथे कंत्राटी पद्धतीने सदरचा व्यवसाय करण्यासाठी लाभार्थींना कुक्कुट पक्षी खाद्य व पाण्याची भांडी या मूलभूत सुविधा उभारण्याकरीता 50 टक्के अनुदान देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कंत्राटदार व्यावसायिक कंपनीला प्रत्येक युनिटमागे कंपनीच्या या अनुषंगाने आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी 1 लाख रुपये यानुसार अनुदान देण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या उर्वरित खर्चापैकी 10 टक्के एवढा निधी लाभार्थीने स्वतः उभारणी करायची असून उर्वरित 40 टक्के निधी बँकेकडून कर्जाद्वारे मंजूर करून घ्यावा लागातो.

13. केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय कुकुट प्रक्षेत्रांना अर्थसहाय्य :-

ही योजना केंद्र शासनच्या परसारतील कोंबडी पाल विकासाच्या धोरणाप्रमाणे तयार करण्यात आली आहे. देशी कुक्कुट पक्ष्यांऐवजी (ARI approved bird species for Backyard poultry) यांचा अंतर्भाव करुन त्यातून ग्रामीण भागात अंडी उत्पादन वाढवण्याचा हेतू आहे. प्रकल्पाअंतर्गत उबवण्याच्या अंड्याची टक्केवारी व उबवणुकीची क्षमता जास्तीत जास्त राहील. याकरिता उपाययोजना करण्याचे कामही ही समिती करते. त्याचबरोबर उत्पादितत झालेले एकदिवसीय पक्षी व तलंग तसेच पदाशीचे नर यांची विक्री योग्य वाया, योग्य दरात, पूर्णपणे विक्री होईल याचीही काळजी घेतली जाते. यासाठी शेतकऱ्यांना आणि लाभार्थींना परसातील कोंबडीपालनाचे प्रशिक्षण दिले जाते.

14. सधन कुक्कुट विकासगटाची स्थापना व बळकटीकरण :-

ही योजना जिल्हा परिषदेच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत यंत्रसामग्री, साधनसामग्री खरेदी व बांधकामावरील खर्चासाठी तरतूद आहे.

15. राज्यातील शेळी - मेंढी पालन व्यवसाय :-

शेळी - मेंढी पालन व्यवसाय दुष्काळी व निमदुष्काळी भागात मेंढीपाळांकडून विशेषत: धनगर समाजाकडून केला जातो. शेळ्यांपासून मांस, दूध, कातडी, लेंडीखत, आणि याबरोबरच मेंढ्यांपासून लोकर उत्पादन मिळते. राज्यातील मेष पालन व्यवसाय सुमारेएक लाख कुटुंबाकडून केला जातो. तर 95 टक्के खेड्यांमध्ये 48 लाख कुटुंबांकडून शेळी पालन केले जाते.

16. राज्यातील मांसाचे उत्पादन :-

राज्याच्या सांख्यिकी विभागच्या माहितीनुसार, सन 2008 - 2009 मध्ये शेळ्या - मेंढ्यापासून मिळणार मांसाचे उत्पादन 34.52 टक्के (मेंढी 11.34 टक्के आणि शेळी 23.18 टक्के) आहे. यामध्ये महाराष्ट्रात शेळ्या मेंढ्यांपासून मिळणारे सरासरी उत्पादन हे 11 कि. ग्रॅ. आहे. हे उत्पादन वाढवण्यासाठी आणि शेळी - मेंढी पालनाद्वारे बेरोजगारांच्या हाताला रोजगार मिळावा म्हजू-ा राज्य सरकारतर्फे अनेक योजना रावण्यात येतात.

17. मेष व लोज्र विज्ास :-

राज्यात शेळी व मेंढी पालनाच्या बहुतेक सर्व योजना व धनगर समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या योजना पुण्यश्लोक आहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळातर्फे राबविण्यात येतात. राष्ट्रीय मेंढा, बोकड पदास कार्यक्रमाखाली केंद्र सरकारकडून प्राप्त होणाऱ्या अर्थसहाय्यातून या महामंडळातर्फे खालील योजना राबविण्यात येतात. सुधारित जातींचे मेंढे आणि बोकड यांची पदास करुन वाटप करणे, शेळी - मेंढी पालन प्रशिक्षण, यांत्रिक पद्धतीने लोकर कातरणे, ठाणबंद पद्धतीने शेळी - मेंढी पालन योजना, केंद्र पुरस्कृत मडग्याळ मेंढ्यांचे संवर्धन विकास योजना. केंद्रीय लोकर विकास मंडळ पुरस्कृत वुल्स एक्स्पो, एकात्मिक लोकर सुधार कार्यक्रम आदींचा यात समावेश आहे.

18. शेळीपासून मिळाणाऱ्या दुधाचे उत्पादन :-

राज्यातील शेळ्यांचे एका दिवसाचे सरासरी उत्पादन 219 ग्रॅम्स आहे. राज्यामध्ये उत्पादित होणाऱ्या दुधापैकी एकूण चार टक्के वाटा हा शेळ्यांच्या दुधाचा आहे.

19. शेळ्या - मेंढ्यांपासून मिळणाऱ्या मांसाची निर्यात :-

आपल्या देशाचा शेळ्यांपासून मिळणाऱ्या मांसाच्या उत्पादनामध्ये दुसरा तर मेंढ्यापासून मिळजाऱ्या मांसाच्या उत्पादनामध्ये सातवा क्रमांक लागतो.

20. लोकर उत्पादन :-

राज्यातील लोकर प्रामुख्याने काळी - पांढरी मिश्र रंगाची आहे. लोकर कातरणी ही वर्षातुन दोनदा केली जाते. पहिली जून - जुलै मध्ये तर दुसरी ही साधारणत: त्यानंतर सहा महिन्यांनतर केली जाते. राज्यातील मेंढ्यापासून सरासरी 585 ग्रॅम एवढी लोकर उत्पादित होते.

ग्रामीण भागात शेतीबरोबरच शेतकऱ्यांना पूरक व्यवसायाची संधी मागील अनेक वर्षे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभाग करुन देत आहे. याद्वारे शेतकरी आणि ग्रामीण भागातील लोक आपला उदरनिर्वाह करीत असून यामुळे त्यांच्या हातात चार पैसेही पडू लागले आहेत.